श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-६, अंक-११ | नोव्हेंबर-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## ‘SVJCT Dream Health Park’ अर्थात ‘स्वप्न शरीरस्वास्थ्या’चे

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने ‘स्वप्न शरीरस्वास्थ्या’चे हा अभिनव प्रकल्प दि. २०.१०.२०१८ पासून सुरू केला आहे. रुग्णालयाच्या स्थापनेपासूनच जनतेचे आरोग्य उत्तम कसे राहील याचाच विचार ही संस्था करत आहे. यासाठी पुणे, मुंबई, इंग्लंड व अमेरिका येथून निरनिराळ्या विषयातील तज्ज्ञ डॉक्टर या ठिकाणी येतात. रुग्णांना नियमित उपचार आणि मार्गदर्शन करतात. त्यासाठी रुग्णालयात निरनिराळ्या आरोग्य शिबीरांचे आयोजन केले जाते.

त्याचा पुढचा टप्पा म्हणजेच ‘स्वप्न शरीरस्वास्थ्या’चे अर्थात ‘SVJCT Dream Health Park’. आपल्या स्वत:च्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचे आत्मपरीक्षण करून त्याप्रमाणे आपल्या जीवनशैलीत आपण बदल करणे या संकल्पनेवर आधारित या ड्रिम हेल्थ पार्कची रचना केली गेली आहे. हे ज्ञान केवळ आपल्या आरोग्याशीच निगडीत नाही. विज्ञानाच्या साहाय्याने आपल्या रोजच्या जीवनशैलीत कोणते बदल करावेत, काय सुधारणा करावी, याचे मार्गदर्शन या प्रकल्पाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. SVJCT Dream Health Park आपल्या शरीराचे आणि मनाचे मूल्यांकन करण्याची प्रेरणा देईल. आरोग्याबद्दल ज्ञान तर याद्वारे मिळेलच पण ते सुधारण्यास लागणारी शास्त्रोक्त माहितीही या प्रकल्पातून मिळेल. भारतीय संस्कृतीतील अनेक परंपरांमागचा शास्त्रीय विचार या माध्यमातून स्पष्ट होईल.

भारतीय संस्कृतीला विज्ञानाची जोड मूलत:च आहे हे दर्शविण्यासाठी आपले शारीरिक व मानसिक आरोग्य विज्ञानाशी निगडीत असून त्याद्वारे भारतीय संस्कृतीचे महत्त्व पटवून देण्यात आले आहे. येथे माणसाच्या आहारविहाराचा विचार करण्याबरोबरच




*ड्रीम हेल्थ पार्कचे उद्घाटन करताना डॉ. क़ाकोडकर, सोबत (डावीकडून)डॉ. टी.रामस्वामी, श्री. अशोक रघुनाथ जोशी तथा श्रीकाका महाराज, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. श्रीपाद बाणावली,*

व्यायाम, वाचन, खेळ, शरीराची एकूण रचना याचा सर्वांगीण विचार केला आहे. नवजात अर्भकापासून वयोवृद्ध स्त्री पुरुषांसह सर्वांच्याच शरीरस्वास्थ्याचा विचार केला आहे. या पार्कचा लाभ समाजातील १० ते १८ वयोगटातील सर्वांनी घ्यावा व आपली जीवनशैली कशा पद्धतीने ठेवावी याचे मार्गदर्शन जरूर घ्यावे.

अशा या नाविन्यपूर्ण SVJCT Dream Health Park चा उद्घाटन समारंभ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते झाला. ‘येथे ही जी नवसंकल्पना उभी केली आहे ती अतिशय सुंदर आहे. असे दुसरीकडे कुठेही पाहायला मिळत नाही. या ठिकाणी जे विविध आणि नावीन्यपूर्ण प्रकल्प आहेत ते अतिशय उत्तम आहेत. त्यांचा प्रसार व प्रचार होणे अत्यंत जरुरीचे आहे. येथे जे काम आहे तसे सर्वत्र व्हावयास हवे. हे अतिशय उत्तम काम आहे. आपल्या स्वत:च्या शरीराचे मूल्यांकन स्वत:लाच करता यावे अशा पद्धतीची रचना या



*ड्रीम हेल्थ पार्कची पाहाणी करताना डॉ. काकोडकर आणि (डावीकडून) डॉ. मैत्रा, डॉ. पाटील, डॉ. अरविंद यादव, डॉ. बाणावली आणि डॉ. नेताजी पाटील*



*पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर आपले विचार व्यक्त करताना, सोबत (डावीकडून) - डॉ.सुनील नाडकर्णी, डॉ. नागवेकर, डॉ. पाटील, श्रीकाकामहाराज जोशी आणि डॉ. श्रीपाद बाणावली*

ड्रिम हेल्थ पार्कमध्ये साकारली आहे. या हेल्थ पार्कमध्ये जे ज्ञान मिळेल ते केवळ आपल्या आरोग्याबद्दलचेच नसेल तर विज्ञान व तंत्रज्ञान यांची सांगड घालून स्वत:लाही यामध्ये सुधारणा करून बदल करता येईल असे असेल. यातून भारतीय संस्कृतीचे गूढ समजण्यास मदत होईल. या ठिकाणी चाललेल्या सर्व कार्यास शुभेच्छा’ अशा भावना डॉ. अनिल काकोडकर यांनी या वेळी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाला संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोक रघुनाथ जोशी तथा श्रीकाका महाराज, कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, कॅन्सरतज्ज्ञ डॉ. श्रीपाद बाणावली, अस्थीरोगतज्ज्ञ डॉ. सुनील नाडकर्णी आणि डॉ. पवनकुमार कोहली, सॅक कमिटीचे सदस्य पद्मभूषण डॉ. टी.रामस्वामी, विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, पुणे येथील श्री. चंद्रशेखर गर्दे, श्री. बाळासाहेब काजरेकर व रुग्णालय, मेडिकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज, कॉलेज ऑफ अॅडव्हान्स स्टडीज, इंग्रजी शाळा या ठिकाणी कार्यरत असलेले डॉक्टर्स, नर्सेस, शिक्षक, विद्यार्थी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## दीपावलीचे निमित्ताने डेरवण शाळेत व्यवसायाभिमुख कार्यशाळा

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा डेरवण येथे ‘यंग आंत्रप्रेन्यर्स क्लब’ अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे, त्यांच्यामध्ये उद्योजकता विकसित व्हावी या उद्देशाने प्रतिवर्षाप्रमाणे ‘दिवाळी डिलाईट’ या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पणत्या सुशोभीकरण, सुगंधी उटणे, मेणबत्त्या, गिफ्ट बॅग्ज यांचे उत्पादन व विक्री या उपक्रमांचा समावेश असलेल्या या कार्यशाळेत इ.७ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेत विविध आकार व प्रकारांच्या पणत्यांना आकर्षक रंगछटांनी रंगवून त्यावर कुंदन, मणी, काचा, रंगीबेरंगी टिकल्या यांचा वापर करून विद्यार्थ्यांनी पणत्यांचे सुशोभीकरण केले.



*पणत्या रंगविताना विद्यार्थिनी (चौकटीत रंगविलेल्या पणत्या)*

मेणापासून नानाविध फळे, फुले, भौमितीक आकार, रोझ पिलर्स, रोझ बॉल्स, फ्लोटिंग कॅन्डल्स, टी लाईट्स अशा मेणबत्त्यांची निर्मिती केली. तसेच जेलवॅक्स, काचेचे बाऊल्स, ग्लास यांचा वापर करून विद्यार्थ्यांनी पारदर्शक मेणबत्त्या साकारल्या. अनेक रंग, रंगीत रांगोळी, डाळी, मणी, कडधान्ये, आकर्षक टिकल्या, शंख शिंपले अशा वस्तूंच्या साहाय्याने सुबक सुवासिक मेणबत्त्या बनविण्याचा आनंद व आत्मविश्वास विद्यार्थ्यांनी अनुभवला.

त्वचेसाठी उपयुक्त असलेल्या अनेक औषधी व सुगंधी चूर्णाचा वापर करून विद्यार्थ्यांनी सुवासिक व उच्च प्रतीच्या आयुर्वेदिक उटण्याची निर्मिती केली. औषधी चूर्णाचे योग्य प्रमाणानुसार वजन करणे, त्याचे एकत्रित मिश्रण करणे, अचूक वजन करून आकर्षक पद्धतीने पॅकिंग करणे अशा सर्वच क्रिया विद्यार्थ्यांनी सफाईदारपणे पार पाडल्या. मार्बल प्रिटींगचा वापर करून अत्यंत सुंदर, आकर्षक व टिकाऊ अशा कागदापासून निर्मित इको फ्रेंडली गिफ्ट बॅग्जची निर्मिती देखील या कार्यशाळेत करण्यात आली.



*सुगंधी उटण्याची शास्त्रशुद्ध निर्मिती*



*वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अनिल काकोडकर यांनी 'अटल टिंकरिंग लॅब'ला भेट देऊन विद्यार्थी व शिक्षकांना संशोधनात्मक वैज्ञानिक उपक्रमांबद्दल मार्गदर्शन केले.*

कार्यशाळेत विविध वस्तू तयार करत असतांना विद्यार्थ्यांची एकाग्रता, सांघिक भावना, सर्जनशीलता, क्रियाशीलता, कार्यकुशलता अशी विविध कौशल्ये विकसित झाली. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या योगदानाबद्दल ठरावीक रक्कम शाळेतर्फे त्यांच्या बँक खात्यात जमा करून विद्यार्थ्यांना स्वकमाईचा आनंद दिला जातो.

## राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा क्रीडासंकुलात संपन्न

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी द्वारा आयोजित शालेय राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा एसव्हीजेसीटीच्या क्रीडासंकुलात उत्साहात संपन्न झाली. दि २२ ते २४ ऑक्टोबर या कालावधीत १४, १७ आणि १९ वर्षाखालील मुले आणि मुलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्याच्या आठ विभागातील २४० बुद्धिबळपटूंनी आपले कौशल्य पणाला लावले.

या स्पर्धेचे उद्घाटन चिपळूणचे तहसीलदार श्री. जीवन देसाई यांच्या हस्ते झाले. 'शालेय स्पर्धांच्या माध्यमातून करियर घडवता येते. खेळासाठी प्रत्येक भरतीत पाच टक्के कोटा ठेवण्यात आलेला आहे. त्याचा फायदा प्रत्येक खेळाडूने घ्यावा.' असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. येथील क्रीडासंकुल हे कोकणासाठीच नव्हे तर संपूर्ण देशातील खेळाडूंना प्रगतीपथावर नेईल असा मला विश्वास आहे असेही त्यांनी आवर्जून सांगितले. उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी डॉ. नेताजी पाटील यांनीही खेळामुळे मिळणारी शारीरिक तंदुरुस्ती आणि तयार होणारी निर्णयक्षमता ही भावी जीवनातील संकटाना सामोरे जाण्यासाठी आवश्यक आहे असे सांगितले. या वेळी जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.मिलिंद दीक्षित, क्रीडा संचालक श्री. श्रीकांत पराडकर तसेच फिडे आर्बिटर श्री. विवेक सोहनी, श्री. चैतन्य भिडे हे हजर होते.

कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर, अमरावती या आठ विभागातून आलेल्या प्रत्येकी पंधरा मुले आणि मुलींनी, क्रीडा संकुलातील भव्य हॉलमध्ये खेळण्याची मजा काही वेगळीच आहे असे आवर्जून सांगितले. प्रत्येक पटासाठी वेगळे टेबल ही आमच्यासाठी नावीन्याची गोष्ट आहे हेही नमूद केले. खेळासाठी अशा प्रकारचे भव्य क्रीडांगण उपलब्ध करून देणारी ही संस्था बघून आनंद आणि आश्चर्य वाटले असे नागपूर विभागाच्या पालकांनी सांगितले.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com





*'एसव्हीजेसीटी'च्या भव्य क्रीडासंकुलात रंगलेली शालेय राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून नोव्हेंबर २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०२ व ०३ नोव्हेंबर | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| ०३ नोव्हेंबर | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टीक सर्जन) | दुभंगलेले टाळ व ओठ शस्त्रक्रिया |
| ०३ व ०४ नोव्हेंबर | डॉ. सतेज सबनीस, मुंबई (युरोलॉजिस्ट) | मुतखडा शस्त्रक्रिया |
| १० नोव्हेंबर | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाचे विकार |
| ११ नोव्हेंबर | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन ) | भाजलेले व्रण, डाग शस्त्रक्रिया व उपचार |
| १६/१७ नोव्हेंबर | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १७ नोव्हेंबर | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १७ नोव्हेंबर | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग |
| १८ नोव्हेंबर | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनावर उपचार |
| १७ व १८ नोव्हेंबर | डॉ. स्मिता आजगांवकर, अमेरिका | मधुमेह आणि थायरॉईड |
| २५ नोव्हेंबर | डॉ. रोहिणी सामंत, मुंबई (रूमॅटोलॉजिस्ट) | संधीवात |
| २५ नोव्हेंबर | डॉ. फुलरेणू चव्हाण, मुंबई (एंडोक्रायनोलॉजिस्ट) | मधुमेह आणि थायरॉईड |
| | डॉ. के.एस.कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रूग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
**वालावलकर रुग्णालय येथे RHTC व वालावलकर रुग्णालय यांचे एकत्र डोहाळेजेवण व सासू सून मेळावा – २४ नोव्हेंबर**
**सहा महिन्यांचे वाढदिवस** – २९ नोव्हेंबर । **सरपंच मेळावा** – २२ नोव्हेंबर

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर